My computer/c/all file/अस्थापना/letter doc

पिंपरी चिंचवड महानगरपालिका
लेखा विभाग,
क्र.लेखा/१अ/कावि/८७४/२०१७
दि. १० /१०/२०१७

**विषय :- निविदा बाबत....**

**संदर्भ** :- परिपत्रक क्र.लेखा/१अ/कावि/६७५८/२०१७
दि.४/८/१७.

**परिपत्रक**

संदर्भिय परिपत्रकानुसार पिंपरी चिंचवड महानगरपालिकेत र.रू.१.५ कोटी पेक्षा कमी रकमेच्या निविदा भरताना निविदा धारक हा महानगरपालिकेत नोंदणीकृत असणे आवश्यक आहे.

याबाबत मा.स्थायी समिती सभापती, मा.आयुक्त व इतर अधिका-यांमधील झालेल्या चर्चेनुसार यापुढे दि.१/११/२०१७ पासून वस्तू व सेवा यांचा पुरवठा तसेच इतर सर्व प्रकारची कामे या करीता निविदा भरताना निविदा धारक महापालिकेत नोंदणीकृत असणे आवश्यक असणार नाही.

तसेच निविदा उघडतांना निविदा समितीच्या सर्व सदस्यांच्या ऐवजी एक KEY परिपत्रक दि. ०४/८/२०१७ मधील नमूद केलेल्या निविदा समितीच्या अध्यक्षाची राहील तर दुसरी KEY लेखा विभागातील लेखाधिका-याची राहील. रक्कम रु. २५.०० कोटी वरील निविदा संबंधित विभागप्रमुखाचे व मुख्यलेखापाल यांच्या KEY ने उघडाव्यात .

निविदांबाबतचे परिपत्रक दि. ०४/८/२०१७ मधील QCBS वा तत्सम प्रकारच्या निविदा वगळता इतर निविदांसाठी निविदा समीती रद्द करण्यात येत असून निविदांची पडताळणी या परिपत्रकाचे पूर्वीप्रमाणे यापूढे करण्यात यावी.

Online निविदा भरण्याकरीता संगणकीय प्रणालीत आवश्यक ते बदल करणे तसेच निविदा भरण्यास इच्छुक असणा-यांनाKey उपलब्ध होण्याकरीताची प्रणाली/आवश्यक माहिती विभागांना पुरविण्याचे काम माहिती व तंत्रज्ञान विभागाने दि.२५/१०/२०१७ पर्यंत करावे.

10/10

**आयुक्त**
पिंपरी चिंचवड महानगरपालिका,
पिंपरी -१८

प्रती :- सर्व विभागप्रमुख